भरधाव ट्रकने दुचाकीला उडविले

उमरेड : नागपूर-उमरेड महामार्गावरून भरधाव वेगाने येणाऱ्या एमएच ४०/एसी-६८३९ क्रमांकाच्या ट्रकने एमएच ४०/टी २४३३ क्रमांकाच्या दुचाकीला जोराची धडक देऊन उडविल्याची घटना रविवारी (५ मार्च) सांयकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास गंगापूरजवळील पिकनिक स्पॉटजवळ घडली. यामध्ये दुचाकीचालक शालीक महादेव झोडे(६५) यांचा जागीच मृत्यू झाला. ते येवती येथील शेतातून उमरेड येथे घरी परतत होते. दरम्यान, ही दुर्दैवी घटना घडली.

कारच्या धडकेत एक ठार

धामना : येथूनच जवळ असलेल्या पेठ कालडोंगरी येथील उड्डाणपुलावर कारने एका स्कुटीला धडक दिल्याने स्कुटीचालकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना रविवारी(५ मार्च) सायंकाळी साडेपाच वाजताच्या सुमारास घडली. शेषराव रामाजी बेपारी (४०, त्रिमूर्तीनगर, नागपूर) असे मृताचे नाव आहे. ते साक्षगंधासाठी पेठ येथे आले होते. दरम्यान, रस्ता ओलांडताना अपघात घडला. मृतक हे स्कुटी क्रमांक एमएच ३१/डीवाय ८७७४ ने रस्ता ओलांडत होते. दरम्यान, नागपूरवरून येणाऱ्या एमएच २७/एसी १७७४ क्रमांकाच्या कारने त्यांना धडक दिली. मृतकाने हेल्मेट डोक्यात घातल्याने गंभीर दुखापत डोक्याला झाली होती. घटनेची माहिती हिंगणा पोलीस ठाण्याला देण्यात आली. पुढील तपास सुरू आहे.

'महिलांचे कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषण 'वर कार्यशाळा

नरखेड : मुंदाफळे समाजकार्य महाविद्यालयात नुकताच 'महिलांचे कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषण' या विषयावर कार्यशाळा पार पडली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुनील ठाकूरवार तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. प्रज्ञा कामडी, अनिल रेवतकर, प्रा. डॉ. चंद्रशेखर मोहोड उपस्थित होते. प्रा. डॉ. मंगला कडवे व प्रा. सविता चव्हाण यांनी कार्यशाळेचे आयोजन केले होते. कार्यशाळेत पोस्टर, चार्टपेपरबद्दल माहिती देण्यात आली. प्र.ा कामडी यांनी कायदेविषयक मार्गदर्शन केले, तर डॉ. ठाकूरवार यांनी तक्रारनिवारण समितीच्या कामाबद्दल माहिती दिली. प्रास्ताविक प्रा. डॉ. मंगला कडवे यांनी, तर संचालन मयूरी रामदे व गायत्री रेवतकर यांनी केले. आभार लोकेश बालपांडे यांनी मानले. कार्यशाळेला प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व तक्रारनिवारण समितीचे सदस्य उपस्थित होते.

जिल्ह्यात येनवा शाळा नृत्यात प्रथम

काटोल : शिक्षण विभाग जिल्हा परिषद नागपूरतर्फे पारशिवनी तालुक्यातील टेकाडी येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत वरिष्ठ गटातील सामूहिक नृत्य कलाप्रकारात जि.प.उच्च प्राथमिक शाळा येनवा यांचे शेतकरी नृत्य विजेते तर वरिष्ठ गट (मुले)आट्यापाट्या खेळात उपविजेते ठरले. बक्षीस समारंभाला आमदार मल्लिकार्जुन रेड्डी, शिक्षणाधिकारी (प्राथ.) दीपेंद्र लोखंडे, उपशिक्षणाधिकारी विलास डोर्लीकर, गटशिक्षणाधिकारी विलास काटोले प्रामुख्याने उपस्थित होते. मुख्याध्यापिका विजया पोहणे, महेश राकेश, गिरीश गौरखेडे, अनीता खेडकर, धनराज कळंबे, शोभा आमले यांनी स्पर्धेसाठी अथक परिश्रम घेतले. स्पर्धेत साक्षी उमप, चैताली कठोळे, रिया ठाकरे, खुशाली ठाकरे, प्राची गजभिये, कुमकुम माळवी, अश्विनी बोरकर, हर्षल मानकर, ऋतिक मानकर, अंकित कांबळे यांनी चांगली कामगिरी बजाविली.

निमखेडा येथे आम दंगल

निमखेडा : स्थानिक जय बजरंग व्यायामशाळा व माँ तुळजा भवानी शैक्षणिक संस्थेच्या संयुक्त विद्यमाने पारशिवनी तालुक्यातील निमखेडा येथे नुकतेच आम दंगलीचे आयोजन करण्यात आले होते. उद्घाटन खासदार कृपाल तुमाने यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेत नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया जिल्ह्यांतील पहीलवानांनी सहभाग नोंदविला होता. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमाला रमेश कारेमोरे, किशोर बेलसरे, शिवकुमार यादव, महेंद्र भुरे, योगेश वाडीभस्मे, देवेंद्र गोडबोले, गजानन वांढरे, अमोल साकोरे, भीमराव वाडीभस्मे, गुणवान आंबागडे, कैलास खंडा र, कोठीराम चकोले, व्यंकट कारेमोरे, नेवालाल सहारे, भगवान सरोदे, अनिल उके उपस्थित होते. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी देविदास तडस, शंकर पोटभरे, नारायण पोटभरे, राजू चांदेकर, पुरुषोत्तम पोटभरे, मनोज चोपकर, संजय वगाईतकर, रवी गुडधे, राजा चकोले, नीलेश दमाहे व ग्रामस्थांनी सहकार्य केले.

अर्जदाराची उपविभागीय अधिकाऱ्याकडे न्यायाची मागणी

कामठी : कामठी तहसीलअंतर्गत येणाऱ्या वडोदा ग्रामपंचायत येथे अर्जदाराने शेतीचे फेरफार प्रकरण तलाठ्याकडे सादर केले. परंतु वेळ होऊनही काम न झाल्याने अर्जदाराने उपविभागीय अधिकाऱ्यांसह संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देऊन न्याय देण्याची मागणी केली. सध्या हे प्रकरण तालुक्यात गाजत आहे. कोठीराम महादेव बोबडे हे वडोदा येथे राहत असून त्यांच्या आईच्या नावाने शेतजमीन आहे. ही जमीन सध्या मंजुळा महादेव बोबडे यांच्या नावे आहे. त्यांचा मृत्यू झाल्याने अर्जदार बोबडे यांनी वारसानाची नावे चढविण्याकरिता संबंधित कागदपत्रे जोडून २० सप्टेंबर २०१६ रोजी तलाठ्याकडे दिले होते. मात्र अजूनपर्यंत फेरफार करण्यात आले नाहीत. याबाबतची तक्रार बोबडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे करून न्याय मिळवून देण्याची मागणी केली.

बोकडाने मारले अन् मालकाचा जीव गेला

पुण्य नगरी / प्रतिनिधी

कोंढाळी : विकासनगर येथील वृद्ध शेतकऱ्यांचा बकरीपालनाचा व्यवसाय. त्यातून त्याचे अर्थार्जनही चालायचे. परंतु, याच बकऱ्याच्या कळपातील एखादा बोकड आपला काळ ठरेल, असे त्यांना स्वप्नातही वाटले नसावे. अन् २६ फेब्रुवारीला ते नेहमीप्रमाणे बकरी चारावयास जात होते. दरम्यान, बकऱ्या सोडताना कळपात बोकडांची तुफान हाणामारी झाली. त्यातच एक आडदांड बोकड शेतकऱ्याचा अंगावर धावून आला. त्यात बोकडाचे शिंग त्यांना लागले. दुखापत झाली. त्यामुळे १ मार्च रोजी उपचारादरम्यान त्यांच्या आयुष्याची प्राणज्योत मालवली.

संतोष माणिकराव शेंडे (८०) अशा या वृद्ध शेतकऱ्याचे नाव आहे. एका क्षुल्लक दुखापतीने संतोष यांचा जीव गेल्याने परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

त्याचे असे झाले की, कोंढाळी येथील विकासनगर परिसरात संतोष माणिकराव शेंडे हे वृद्ध शेतकरी राहायचे. काहीसे शेतीकाम आणि बकरीपालन त्यांचा महत्त्वाचा व्यवसाय होता. २६ फेब्रुवारीला सकाळी नऊ वाजता आपल्या रखवालीतील बकरी व बोकडांना चारण्यासाठी सोडताना एका बोकडाने काहीही एक न बघता भन्नाटल्यागत संतोष यांच्यावर हल्ला चढविला. त्यांच्या उजव्या हाताला शिंगामुळे जखम झाली. घरच्या बोकडाने केलेला हल्ला सुरुवातीला त्यांनी गंभीरतेने घेतला नाही. परंतु, जखम विव्हळत आणि खोलवर होती. त्यामुळे त्यांनी थेट उपचारासाठी डिगडोह येथील लता मंगेशकर हॉस्पिटल गाठले. त्यांच्यावर उपचार झाले. परंतु, डॉक्टरांची औषधी त्यांच्यावर अपयशी ठरली आणि संतोष यांचा १ मार्चला सकाळी ८.५५ वाजता मृत्यू झाला. कोंढाळी पोलीस ठाण्यात त्यांचे पुत्र युवराज संतोषराव शेंडे (५३, समर्थ गजानन सोसायटी, दत्तवाडी, नागपूर) यांच्या तक्रारीवरून सर्वप्रथम एमआयडीसी, जि.नागपूर येथील पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला. प्रकरण कोंढाळी पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आले असून ठाणेदार प्रदीप चौगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक नीलेश वाडिवा तपास करीत आहेत.

गुन्हा कुणावर ? पोलीस अडचणीत!

एका बोकडाने मारले म्हणून वृद्ध शेतकऱ्याचा जीव गेला. त्यामुळे पोलिसांनाही पेच पडला. कलमांचे पुस्तक चाळले. परंतु, गुन्हा नोंदविण्यास मोठी अडचण झाली. सरते शेवटी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली. परंतु, आता जीव घेणाऱ्या बोकडाला खाटकाच्या स्वाधीन केल्याशिवाय दुसरा कुठलाही पर्याय मृत शेतकऱ्याच्या नातेवाइकांजवळ उरला नाही.

खापापाटण येथे सेप्टी टँकने घेतला एकाचा बळी

■ दुसरा गंभीर, सोबतचेही भोवळ येऊन पडले ■ श्वास गुदमुरल्याने घडली घटना

पुण्य नगरी प्रतिनिधी

खापरखेडा : सावनेर तालुक्यातील खापरखेडालगतच्या खापापाटण येथील प्रशांत बाळबुद्धे (२९) यांच्याकडे सेप्टी टँक स्वच्छ करण्यासाठी गेलेल्या दोघांपैकी श्वास गुदमुरल्याने एकाचा मृत्यू तर एक गंभीर जखमी झाल्याची घटना शनिवारी (४ मार्च) रोजी रात्रीला ११.३० वाजताच्या सुमारास घडली.

प्रसंगी, आरडाओरड केल्याने तातडीने दोघांनाही टँकमधून बाहेर काढण्यात आले. मृताचे नाव दशरथ वसंतराव खंडारे (४०) तर जखमीचे नाव तुळशीराम नारायण गंगाटे (३५) असे आहे. त्यातील दिलीप समुद्रे व जयसिंग प्रेमलाल भलावी (४०) यांना हा प्रकार पाहून भोवळ आल्याने त्यांना उपचारार्थ हलविण्यात आले. घटनाक्रम असा की, खापापाटण येथील प्रशांत बाळबुद्धे यांच्याकडे शौचालयाची सेप्टी टँक भरल्याने ते साफ करण्याचे काम घटनेच्या पूर्वी महादुला कोराडी रहिवासी दिलीप संमुद्रे यांना साडेपाच हजार रुपयांमध्ये देण्यात आले होते. समुंद्रे हे सहकारी मृतक दशरथ वसंतराव खंडाते, तुळशीराम नारायण गंगाटे व जयसिंग प्रेमलाल भलावी यांना बाळबुधे यांच्या घरी सेफ्टी टँक सफाईला घेऊन गेले. रात्री अकरा वाजतापर्यंत बाहेरील काम केल्यानंतर सेप्टी टँकच्या कामाला सुरुवात केली. दरम्यान, टँक अधिक चांगल्या तऱ्हेने स्वच्छ व्हावी म्हणून प्रथम दशरथ टँकमध्ये उतरले. त्यानंतर त्यांच्या मदतीला तुळशीरामसुद्धा उतरले. परंतु, टँकचे झाकण अरुंद असल्याने दोघांनाही श्वास घेणे कठीण जात होते. त्या वेळी घरमालक प्रशांत बाळबुद्धे यांनी घटनास्थळी धाव घेऊन कसेतरी दोघांनाही सेप्टी टँकमधून बाहेर काढले. परंतु, दोघांचीही काही वेळ हालचाल झाली नाही. दोघेही बेशुद्ध होते. हा प्रकार पाहून दिलीप समुद्रे व जयसिंग भलावी भोवळ येऊन खाली पडले. त्या वेळी घटनास्थळी मोठी गर्दी जमली होती. तातडीने चौघांनाही नजीकच्या स्वामी विवेकानंद हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी भरती करण्यात आले. परंतु, त्यातील दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना रुग्णवाहिकेने मेयो रुग्णालयात हलविण्यात आले. परंतु, उपचारापूर्वीच यातील दशरथचा मृत्यू झाला होता. तुळशीरामची प्रकृती गंभीर आहे. मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले.

घटनेचा पुढील तपास खापरखेडा ठाणेदार महेश चाटे यांच्या मार्गदर्शनात सुरू आहे. मृत दशरथला पत्नी, दोन मुले व बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्यावर खापा येथे आज, रविवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

कल्पना भातगिरणीवर केदार गटाचे वर्चस्व

पुण्य नगरी / तालुका प्रतिनिधी

मौदा : तालुक्यातील महादुला (बोरगाव) येथे रविवारी (५ मार्च) झालेल्या निवडणुकीत केदार गटाने घवघवीत विजय प्राप्त केला.

येथील स्व. अशोककुमार गुजर कल्पना सहकारी भातगिरणी मर्यादित महादुला व्यवस्थापन समितीची निवडणूक २०१७ ते २०२२ या कालावधीत घेण्यात आली. या भाजपासमर्पित पॅनलविरुद्ध इतर सर्व म्हणजे केदार गट सहकार पॅनल असा चुरशीचा सामना रंगला होता. यात केदार गटाच्या सहकार पॅनलचे सर्व उमेदवार निवडून आले.

विजयी उमेदवारांमध्ये संजय ढोबळे, संपत गायधने, नागोराव मानकर, रामदास वाडीभस्मे, मधुकर सेलोकर, अजय हारोडे महिला राखीव गटातून अनसूया उईके, मीना चौधरी तसेच अनुसूचित जाती गटातून आनंदराव हिरेखण इतर मागासवर्ग गटातून नारद किरपान, प्रकाश कुहीकर अविरोध निवडून आले असून ते भाजपा सावरकर गटाचे आहेत.

या विजयामागे सावनेरचे आ. सुनील केदार यांचे मार्गदर्शन असल्याचे सांगण्यात येते. विजयी उमेदवारांचे अभिनंदन उपसभापती पं.स.मौदाचे राजेश ठवकर, शिवसेना तालुकाप्रमुख तापेश्वर वैद्य, माजी जि.प.सदस्य देवेंद्र गोडबोले, सामाजिक कार्यकर्ता बंडू सर्वे, राजेंद्र लांडे, राकेश बागडे, सीताराम ठाकरे आदींनी अभिनंदन केले.

पावले चालती साईशिर्डीची वाट

■ ठिकठिकाणी पालखीचे स्वागत

पुण्य नगरी / वार्ताहर

वाडी-डिफेन्स : अयोध्यानगर नागपूरच्या साईमंदिरातून श्रीशिर्डीसाई द्वारकामाई पदयात्रा सेवा समिती नागपूर यांच्या वतीने पायदळ वारी शिर्डीला आज, रविवारी सकाळी सव्वासात वाजताच्या सुमारास वाडी परिसरातून निघाली.

भक्त राजेश बागडे यांच्या नेतृत्वात ही पालखी निघाली. २ एप्रिलला ती शिर्डीला पोहोचेल. दरम्यान, दत्तवाडीतील डिफेन्स गेटजवळ ओमसाई राम मंडळाच्या सर्व भाविकांनी पालखीचे स्वागत केले. पाणी पाउच व मठ्ठा वितरण केले. साईबाबांच्या दर्शनासाठी पायदळ वारीत तीनशे महिला व पुरुष भाविकांचा समावेश आहे. मागील तेरा वर्षांपासून दरवर्षी ही वारी शिर्डीला जात आहे. या साईवारीचा पहिला मुक्काम वाडीतील डिफेन्सस्थित साईमंदिर येथे आहे. साईमंदिरामध्ये भाविकांसाठी जेवणाची व राहण्याची व्यवस्था मंदिर

कमिटीकडून करण्यात आली आहे. साई गुरु उत्सवाच्या वेळी साईबाबा स्वतः पालखीवर स्वार होऊन निघायचे आणि संपूर्ण शिर्डीत पालखी भ्रमण करायचे. त्यामुळे या पालखीचे विशेष महत्त्व आहे. या दिवशी साईबाबांचे दर्शन मिळणे म्हणजे सौभाग्यच. ज्याला दर्शन मिळते त्याचे जीवन धन्य होते. त्याच्या जीवनात कोणतीही मनःकामना अपुरी राहत नाही, असा समज आहे. दरम्यान, वाडीनाका, कंट्रोल वाडी व दत्तवाडी डिफेन्ससमोर अल्पोपाहार, पाणी पाउच व मठ्ठा देऊन भव्य स्वागत करण्यात आले. दत्तवाडीतील ओम साईराम मंडळाचे चंद्रशेखर ढोले, सुरेंद्र वाघमारे, राजेश रात्रे, ऋषिकेश अकेला, चंदू वैद्य, गणेश चोपडे, पीयूष लांडगे, शुभम वानखेडे यांनी संगीतमय व भक्तिपूर्ण वातावरण निर्माण करून पालखीचे स्वागत केले.

बीईओंचे आदेश, तरीही शाळेतून शौचालय बेपत्ता; विद्यार्थ्यांची कुचंबणा

■ मुख्याध्यापक म्हणतात, युडायसनुसार शौचालयाची सोय

पुण्य नगरी / शहर प्रतिनिधी

सावनेर : येथील नागपूर रोडवरील भालेराव हायस्कूल येथे मुलाकरिता शौचालय नसल्याने विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात कुचंबणा होत असल्याच्या तक्रारी काही पालकांनी येथील सामाजिक संघटनेकडे केल्या होत्या. त्यानंतर पुण्य नगरीने हे प्रकरण लावून धरले. यानंतर बीईओंनी हे प्रकरण गंभीरतेने घेऊन तातडीने शौचालयाची व्यवस्था करण्याचे आदेश दिले होते. तरीही या शाळेत शौचालयाचे बांधकाम करण्यात शाळा प्रशासनाने स्वारस्य न दाखविल्याने विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे.

याबाबत ग्राहक कल्याण परिषदेचे कार्याध्यक्ष किशोर ढुंढेले यांनी जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांकडे पाठविलेल्या पत्रात म्हटले की, शहराच्या विकासात शैक्षणिक योगदान हे महत्त्वपूर्ण असते. परंतु, एखादे शाळा, महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करू शकत नसेल, तर शैक्षणिक गुणवत्ता काहीही कामाची नाही. यावरून त्यांच्या टीमने विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या मूलभूत सोयीसुविधांविषयी शहरात सर्व्हे केला असता भालेराव शाळेत विद्यार्थ्यांना शौचालयाची कुठलीही व्यवस्था नाही. सर्वोच्च न्यायालय आणि शासनादेश या शाळेने धाब्यावर बसविला. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा स्वच्छ भारत अभियानाला ठेंगा दाखविण्याचे काम शालेय प्रशासनाने केले असल्याचे म्हणणे या संघटनेचे आहे. पुण्य नगरीने याबाबत वृत्त प्रकाशित केल्यानंतर स्थानिक गटशिक्षणाधिकाऱ्यांनी भेट दिली होती. या भेटीला १५ दिवसांचा कालावधी लोटला. याउलट, युडायसमध्ये आमच्या शाळेत मुलाकारिता एक शौचालय असल्याचे सांगत आहे. प्रत्यक्षात मुलांकारिता एकही शौचालय नसल्याचे निर्देशनास आले. त्या आधारावर जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांनी शाळेला भेट देऊन बेजबाबदार शाळा प्रशासनावर कारवाई करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. ही स्थिती अशीच राहिल्यास पालकांच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा ग्राहक कल्याण परिषदेचे कार्याध्यक्ष किशोर ढुंढेले यांनी निवेदनातून दिला.

दिग्गजांच्या उपस्थितीत संस्कृत विश्वविद्यालयाचा दीक्षान्त सोहळा

■ विविध कार्यक्रमांची मेजवानी ■ प्रावीण्यप्राप्त विद्यार्थ्यांना सुवर्ण, रजतपदके

पुण्य नगरी तालुका प्रतिनिधी

रामटेक : कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचा सातवा दीक्षान्त सोहळा रविवार (५ मार्च) किट्स इंजिनिअरिंग कॉलेज, रामटेक येथे उत्साहात पार पडला.

या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री प्रकाश जावडेकर, लालबहादूर शास्त्री राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रमेशकुमार पाण्डेय तर विश्वविद्यालयाच्या कुलगुरू डॉ. उमा वैद्य अध्यक्षस्थानी होत्या. जी. एच. रायसोनी विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. कमल सिंग, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य आणि आमदार आशिष देशमुख, परीक्षा नियंत्रक डॉ. उमेश शिवहरे, कुलसचिव डॉ. अरविंद जोशी व विश्वविद्यालयाच्या इतर महत्त्वपूर्ण पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. दरम्यान, परीक्षा नियंत्रक डॉ. शिवहरे यांच्या नेतृत्वात दीक्षान्त शोभायात्रा सभागृहात आली. त्यानंतर मुख्य कार्यक्रमाला विश्वविद्यालयाच्या वेदशास्त्रासंपन्न विद्यार्थ्यांच्या वेदमंत्रोच्चारणाने प्रारंभ झाला. विश्वविद्यालयगीतानंतर भारतीय धर्म, तत्त्वज्ञान आणि संस्कृती संकायाचे प्रमुख डॉ. मधुसूदन पेन्ना यांनी यांनी विश्वविद्यालयाचा विकास व प्रगतीविषयक अहवाल प्रास्ताविकातून सादर केला. या वेळी कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांच्या हस्ते विविध संकायांतर्गत (शाखा) ३७५ पदव्युत्तर पदवी, ८१६ पदवी, १३५० पदविका, ३५७ प्रमाणपत्र अभ्यासक्रम व १०० पदव्युत्तर पदविका प्रदान करण्यात आल्या. यानंतर कुलगुरूंनी विद्यार्थ्यांना दीक्षान्त उपदेश दिला. या प्रसंगी राज्यपाल विद्यासागर राव यांचा शुभसंदेश वाचून दाखविण्यात आला. पदवीप्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

दरम्यान, कुलगुरू डॉ. रमेशकुमार पाण्डेय म्हणाले, आगम, स्वाध्याय, प्रवचन आणि व्यवहार या चार प्रकारे विद्या ही उपयुक्त ठरते. विद्यार्थ्यांनी आगम काळात गांभीर्याने विद्यार्जन करावे, स्वअध्ययनाद्वारे आपली प्रतिभा व प्रज्ञा विकसित करावी आणि अध्यापनाद्वारे प्राप्त केलेल्या ज्ञानाचे वितरण आणि उपयोग करावा. संस्कृत भाषेतून मिळणारे संस्कार, मानवीमूल्ये यांचा अंगीकार करून आपले व्यक्तिमत्त्व विकसित करावे. आपले नियत कर्म श्रद्धेने आणि निष्ठापूर्वक करून स्वतःची उन्नती व विकास करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी राज्याचे उच्च व तंत्राशिक्षणमंत्री विनोद तावडे यांचा संदेश कुलसचिव डॉ. अरविंद जोशी यांनी वाचून दाखविला. संस्कृत, योग, योगविज्ञान, वास्तू, जर्मन, वेद, ग्रंथालयशास्त्र, ज्योतिष्य, कीर्तन, प्रशासकीय सेवा, शिक्षण, संगणक उपायोजन, नृत्य, चित्राकला, मूर्तिकला आदी ललित कला या ३५ विविध विषयांमध्ये सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना पदके आणि पारितोषिके प्रदान करण्यात आली. सोहळ्याचे संचालन व आभार प्रा. पराग जोशी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राची जावडेकर, प्राचार्य डॉ. बी. राम रतन लाल, विश्वविद्यालयाचे सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, शिक्षकेतर सहकाऱ्यांनी सहकार्य केले.

३८ विद्यार्थ्यांना पीएच.डी.

एम.ए. संस्कृत विषयात सर्वाधिक गुण प्राप्त केल्याबद्दल मृण्मयी दिनेश कुळसंगे, हरिश्चंद्र मालू गावस या विद्यार्थ्यांना सर्वाधिक पदके प्रदान करण्यात आली. हरिश्चंद्र मालू गावस या विद्यार्थ्याला एम.ए. व्याकरणशास्त्रामध्ये सर्वाधिक गुण मिळाले आणि सर्व विद्याशाखांमधून सर्वप्रथम आल्याबददल एस. एल. भीमनवार यांच्या हस्ते स्व. जयराम व्यंकटेश स्मृती रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. शर्वरी दीपक अभ्यंकर, मंजूषा प्रशांत पुरंदरे, सविता जयंत मुळे, मौसम महेंद्र, अक्षय रमेश ऐरे, अन्वेश देवुलपल्ली, नेहा निशिकांत लघाटे, सरिता राजेंद्र गिल्लूरकर, कस्तुरी उबगडे, स्नेहल अशोक तेलमोरे या विद्यार्थ्यांचा प्रथम आल्याबद्दल सन्मान करण्यात आला.